MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

## कारने उडवून केली हत्या वडिलांच्या तक्रारीवरून खुनाचा गुन्हा



देवणी ।प्रतिनिधी

**देवणी : जेवायला चल म्हणून बोलावून बारमध्ये नेले. तेथे दारू पाजून रस्त्यावर सोडले दिले आणि आपल्याच कारने जोराची धडक देऊन प्रवीणानंद विलासराव लंके (वय ३८) याचा खून केला. ही घटना उदगीर तालुक्यातील वागदरी पाटी येथे बुधवारी रात्री घडली** याबाबत मृत तरुणाचे वडील विलासराव लंके यांनी दिलेल्या तक्रारीवरून देवणी ठाण्यात एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. पोलिसांनी आरोपीस अटक केली असून, त्यास न्यायालयाने तीन दिवसांची कोठडी सुनावली आहे. तोगरी येथील प्रवीणानंद यास आरोपी अमोल रामचंद्र बिरादार (रा. करवंदी, ता. उदगीर) याने बुधवारी रात्री कारमधून वागदरी येथील एका बारवर नेऊन दारू पाजली.

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष –०१ अंक –३४७ रविवार दि.०८ सप्टेंबर २०२४ आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -347 SUNDAY DT.08 SEPTEMBER 2024 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

# एक्स्ट्रा आयटमच्या गोंडस नावाखाली कोळ्याने शासनाच्या तिजोरीवर जाळे टाकले?

## मनीषाताई पलांडे मुख्य अभियंता यांनी दिपक कोळी, के बी चिवरेंच्या काळातील पाचशे कोटीच्या कामाची चौकशी करून कारवाई करावी

### एक्स्ट्रा आयटमच्या नावाखाली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचा दीड कोटी गुत्तेदाराच्या घशात का घालायचा दिपक कोळी, के बी चिवरे यांनी उत्तर द्यावे?

- गायकवाड गुत्तेदाराने औरंगाबादलाही टक्केवारी दिलेली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय बीडला चर्चा.?
- दीड कोटींचे टेंडरचे पाच तुकडे करून ऑफलाइन पद्धतीने टेंडर गायकवाड
- गुत्तेदारालाच का द्यायचं के बीचवर यांनी उत्तर द्यावे?
- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागात गायकवाड गुत्तेदाराचा वरदहस्त के बी चिवरेच





बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या एकूण २५ योजना चालू आहेत या पंचवीस योजनेमध्ये ३६६ कोटी रुपयांचा निधी संबंधित उद्याचारांना दिलेला आहे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग बीडच्या वतीने या भर उन्हाळ्यात सुद्धा बीड जिल्ह्याला पाणी मिळाले नाही तर पावसाळ्यात सुद्धा बीड जिल्ह्याला पाणी मिळाले नाही याच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या बिल्डिंगचे काम हे एका गायकवाड नामा गुत्तेदारांनी दिले होते तर त्या गायकवाड गुत्तेदाराने आजपर्यंत दोन वर्षाच्या मदतीमध्ये बिल्डिंग बांधणे बंधनकारक होते व बिल्डिंगचा ताबा देणे बंधनकारक होते परंतु त्या ठिकाणी गायकवाड नामक गुत्तेदाराने आज सुद्धा बिल्डिंगचा ताबा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे अधिकारी असलेले केबीसीवर यांना दिलेला नाही तर बीड पिंपळनेर गांधीनगर रोडवरील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या कार्यालयामध्ये संबंधित कार्यालय गेल्या तीन चार महिन्यापासून गेले आहे परंतु त्या ठिकाणी गायकवाड नामा गुत्तेदारांनी दोन रूमला कुलूप ठोकले आहे गायकवाड नावाचा गुत्तेदार हा त्यांना संबंधित बिल्डिंगचा ताबा देत नाही तर यावेळी के बीच सय्यद अर्शद दीपक कोळी महेश पाटील यांनी मात्र आता कहर केला आहे. यावेळी मात्र आता पुन्हा एकदा नवा घाट घातला आहे यामध्ये दीड कोटींचा एक्स्ट्रा आयटमचे नवीन टेंडर हे ऑफलाइन पद्धतीने देण्याचे काम छत्रपती संभाजी नगर येथील अधिकारी दीपक कोळी महेश पाटील हे देण्याचा प्रयत्न करत आहेत परंतु याचे ई टेंडर करूनच टेंडर ओपन करावे व यामध्ये अनेक एजन्सी अर्ज दाखल करतील नियमाप्रमाणे व दर पत्रक याप्रमाणे दीड कोटीचे एक्स्ट्रा आयटमचे बिल्डिंगचे टेंडर ई टेंडर पद्धतीने द्यावे जर ऑफलाइन पद्धतीने गायकवाड नावाच्या गुत्तेदाराला एक ते दीड कोटी रुपयाचे टेंडर देण्यामध्ये केबीसी यांनी ३० टक्के टक्केवारी घेतली आहे यामध्ये दीपक कोळी महेश पाटील हेही मिंदे असल्याची चर्चा बीडच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागातील कार्यालयात चालू आहे.

*नेकनुर पाणी पुरवठा योजनेत अपहार जनतेच्या तक्रारीची दखल पालकमंत्री धनंजय मुंडेनी घेतली आहे.?
* होळंबे एकाच ठेकेदारकडे १५ योजना योजनेचा ठेका देण्यात आला आहे पण पाण्याचा तुटवाडा बीड जिल्हयातील जनतेच्या भर पावसाळ्यात करावा लागत आहे?
*बीड जिल्हा अकरा तालुक्यातील आमदार खासदार यांचे दुर्लक्ष. झाले आहे की नाही असा प्रश्न चिवरे दिपक कोळी सय्यद अर्शद याना वाटते पण या योजना व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय बीड चा ५०० कोटींचा घोटाळा हा लवकर अधिवेशन काळात गाजणार आहे.?
*भारत देश इंग्रजांनी लुटला पण बीड जिल्हा चिवरे साहेबांनी लुटण्यासाठी प्रभारी कार्यकारी अभियंता पद घेतल आहे का त्यांचे तीन महिने राहिले आहेत पोते भरून नोटा घेऊन जाण्यासाठी सज्ज चिवरे सज्ज झाले आहेत.?
* जिल्ह्यात गेल्या पाच वर्षात पाणी पुरवठया साठी अंदाजे एक हजार कोटी खर्च बीड जिल्हात झाला आहे पण जनतेच्या तोडात पाण्याचा घोट नाही गेला बीड ची जनता तहानलेलीच.?
* रिटायर्ड इंजिनियर यांना दोन दोन लाख रु घेऊन लोलापोड यांनी पुन्हा नियुक्त्या दिल्या.आहेत?
* शासनाच्या तिजोरीवर दरोडा घालणारे दिपक कोळी चिवरे सय्यद अर्शद व त्यांची टीम ला जिम्मेदार धरून राजीनामे घ्यायला हवे झालेला खर्च वसुल करायला हवा?
* श्रीमती मनीषा ताई पलांडे मुख्य अभियंता छत्रपती सभाजीनगर यांचे बीड जिल्ह्याच्या प्रश्नसाठी खास मुलाखात घेऊन त्यांनी दिनांक व वेळ देऊन जनतेचे प्रश्न सोडणे अपेक्षित आहे सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ ला मुलाखत देण्याची मागणी आहे तरी मनिषा ताई पलांडे यांनी दैनिक महाराष्ट्र आरंभ ला महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय बीडच्या ५०० कोटी पेक्षा जास्त रक्कमेच्या खर्च व सबंधित भ्रष्टाचार ची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी जनतेतून होत आहे.?
*जीवन प्राधिकरण कार्यालय समोर घाणीचे सम्राज्य दुर्गंधीमुळे आजारपणाचे लक्षण यावेळी अधिकारी कर्मचारी व परिसरातील नागरिक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग बीड च्या कार्यालय लोकांनी तक्रार केली आहे.?
* जनतेकडून मागणी श्रीमान अविनाश पाठक साहेब जिल्हाधिकारी यांनी अटल अमृत पाणी पुरवठा योजना सुरु करण्यासाठी बैठक लाऊन तंबी द्यावी व तत्कालीन जिल्हाधिकारी दिपा मुंडे मुधोळ साहेब यांनी चिवरे लोलापोड दिपक कोळी सय्यद अर्शद यांच्या भ्रष्टाचार विरोधी मंत्रालय प्रधान सचिव यांना पत्राद्वारे कळविले आहे.?
* बीड जिल्हा तील जल जीवनमुळे नागरिकांचे जल जीवन स्वप्नन उधवस्त होऊ लागले?
*जीवन प्राधिकरण विभागाच्या जमिनीवर लोकांनी अतिक्रमण केले आहे.?

*महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग बीड
श्रीमती मनीषाताई पलांडे साहेब बीड जिल्ह्यातील जनतेच्या प्रश्नाचे आपण जाहीर खुलासा करणार का? .
*जल जीवन चे २५ योजना फेल ठरल्या दोन वर्षात एकही योजना पुर्ण नाही.
*लोकांना पाण्यासाठी भर उन्हाळ्यात तान भागेना आणि पावसाळ्यात सुधा लोकांना पाणी मिळत नाही?
* अमृत अटल बीड शहर पाणी पुरवठा योजना शंभर कोटी खर्च करून फेल गेली बीड शहरातील जनतेस अमृत अटल या नवीन योजनेच्या नळ कनेक्शन पाण्याच्या थेंबाच्या प्रतीक्षेत.?
* भुयारी गटर योजना अठरा कोटीचे पाईप जमिनीत बुजून योजना गुंडाळली.?
*ऑफिस बिल्डिंग साठी ११४ कोटी खर्च करूनही ठेकेदार ताबा देण्यास तयार नाही अजून एक कोटीचे एक्सट्रा आयेटम मंजुरीसाठी पाठविले कार्यकारी अभियंता चिवरेनी उप अभियंता सय्यद अर्षद टक्केवारी घेऊन मंजुरी देण्याचे हालचाली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग बीड भ्रष्टाचाराणे बरबडले कार्यकारी अभियंता के बी चिवरे, अधिक्षक अभियंता दिपक कोळी उप अभियंता सय्यद अर्शद, याची ५०० कोटी पेक्षा जास्त रक्कमेच्या योजना गुत्तेदारांसोबत. गमत करत टक्केवारी घेऊन गुंडाळून टाकण्याचे काम केले आहे तरी मुख्य अभियंता श्रीमती मनीषा ताई पलांडे छत्रपती संभाजी नगर यांचेकडे मराठवाडयाची जिम्मेदारी चे मोठे अव्हाण आहे?

**बीड कार्यालयाकरीता एक्सट्रा आयटम दिड कोटी रुपये चे एस्टीमेटे तयार करून पन्नास लखाचे पाच तुकडे पडून अवैधरित्या मंजुरकरून ठेकेदारचा आणि स्वत: चा खिस्सा भरण्यास बीड येथील अधिकारी मग्न आहे जाता जाता लुटून जायच्या प्रयत्नात आहे**


# कृषिमंत्री नर्तकीला नाचवतोय म्हणून शिव्या देताय


## पण तुमच्या पोटात का दुखतंय? परळीत धनंजय मुंडेंनी भाषण गाजवलं

बीड : नाथ प्रतिष्ठानच्या कार्यक्रमात कृषिमंत्री नर्तकीला नाचवतोय म्हणून माझ्यावर टीका केली जातेय, पण यांच्या पोटात का दुखतंय असा सवाल धनंजय मुंडे यांनी त्यांच्या विरोधकांना केला. नाथ प्रतिष्ठानने १९ वर्षात अनेक महत्त्वाची कामं केली आहेत असंही त्यांनी सांगितलं. नातं प्रतिष्ठांच्या वैद्यनाथ सार्वजनिक गणेश मंडळाच्या गणेशोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी धनंजय मुंडे यांनी हे वक्तव्य केलं. या कार्यक्रमाला बॉलिवूड अभिनेत्री रश्मिका मंदाना उपस्थित होती.

ज्यांचं ज्यांचं नाथ प्रतिष्ठान मध्ये योगदान आहे त्या सगळ्यांचे १९ व्या वर्षी आभार मानतो. आपण या सगळ्या अभिनेत्रींना बोलावलं. चार दिवसांपूर्वी मोठा पाऊस या ठिकाणी झाला. अगोदरच मी कृषिमंत्री. त्यामुळे कृषिमंत्री म्हटल्यानंतर पाऊस जास्त झाला तरी शिव्या खाव्या लागतात. पाऊस कमी झाला तरी उचक्या कृषिमंत्रालाच लागतात. आणि अतिवृष्टी झाल्यानंतर उचकीही लागते आणि पोटहा दुखतं.

नाथ प्रतिष्ठानवर टीका करणाऱ्याना उत्तर द्यायचं आहे. शेतकऱ्यांच्या २,२०० मुलीचं कन्यादान याच नाथ प्रतिष्ठानचा अध्यक्ष म्हणून मला करता आलं. पावसामुळे अडचणीत सापडलेल्या प्रत्येकाला किराणा घरपोच करण्याचं काम याच नाथप्रतिष्ठांनने केलं. कोरोनाच्या काळात ज्यांना त्रास झाला त्यांना रेमडीसेव्हर द्यायचं काम याच नाथप्रतिष्ठानने केलं. या नाथप्रतिष्ठानवर पहिली टीका केली जाते. या कृषिमंत्र्यांना लाज वाटली पाहिजे असं म्हणून इथं नर्तिकांना नाचवलं जातंय अशी टीका केली जाते. पण तुमच्या पोटात का दुखतंय? युगपुरुष छत्रपती शिवाजी





महाराजांचा चित्रपट येत आहे आणि त्या चित्रपटांमध्ये शिवाजी महाराजांच्या सून म्हणून रश्मिका काम करणार आहेत. धनंजय मुंडे वाईट असेल तर त्याला शिवी द्यायचा तुम्हाला अधिकार आहे. पण कलाकाराला नाव ठेवण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला नाही. हो, हा वैद्यनाथ सार्वजनिक गणेशोत्सव दरवर्षी होणार. काही नैसर्गिक संकट आले तर होणार नाही. या वैजनाथ गणेशोत्सवासारखा उत्सव देशात कुठेही होत नाही म्हणून या लोकांच्या पोटात दुखायला लागलंय.

आता निवडणुका जवळ आल्या आहेत. निवडणुका जवळ आल्या म्हणजे आता अनेकांच्या सुप्त इच्छा जागा झाल्या. निवडणुकीत हा कार्यक्रम बदनाम झाला पाहिजे असा प्रयत्न केला जातोय. परळीतील पाण्यामुळे बाधित झालेल्या १००० घरात त्यांच्या जेवणापासून रेशनपर्यंत जबाबदारी याच नाथ प्रतिष्ठान घेतली. बाधित कुटुंबांना प्रत्येकी दहा हजार रुपये नाथ प्रतिष्ठानकडून दिले जाणार आहेत. सध्या राज्यातला शेतकरी संकटात आहे.

# माजलगाव मतदार संघात मतदारांमध्ये संभ्रमावस्था

## जरांगे पाटील यांच्या धास्तीने नेत्यापेक्षा कार्यकर्तेच जुळवू लागले जातीय समीकरण

तेलगाव । प्रतिनिधी

माजलगाव मतदार संघ हा जिल्ह्यातील महत्त्वाचा असा मतदार संघ समजला जातो. माजलगाव, धारूर व वडवणी या तीन तालुक्याचा या विधानसभा मतदार संघात समावेश होतो. या तीनही तालुक्यातील जातीय समीकरणे वेगवेगळी असून धारूर व वडवणी तालुक्यातील मतदारच हे निर्णायक भूमिका बजावणार असल्याने इच्छुक उमेदवाराचे कार्यकर्ते हे जातीय समीकरण जुळवण्यात दंग आहेत. त्यातच जरांगे पाटील यांच्या भूमिकेमुळे अनेकांनी धास्ती घेतल्याने मतदारांमध्ये संभ्रमावस्था दिसून येत आहे.

मागील विधानसभा निवडणुकीत या वेळच्या पेक्षा वेगळे चित्र होते. मात्र महाराष्ट्रातील राजकारणात उलट फेर झाल्याने या मतदारसंघात काहीसे वेगळे चित्र दिसून येत आहे. मागील विधानसभेवेळी राष्ट्रवादी काँग्रेस व भारतीय जनता पार्टी अशी थेट लढत होती. मात्र एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपा एकत्र आल्याने विरोधात असणारे कार्यकर्ते व नेते यांना अजूनही मतदारांना ठाम असा विश्वास देता येत नाही. माजलगाव मतदार संघाची जागा ही अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा साठी जाऊ शकते. आमदार प्रकाश सोळुंके हे अजित पवार सोबत आहेत. मात्र पूर्वी विरोधात लढणारे भाजपाचे नेते यांची मोठी गोची झाली आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना एकत्र असूनही शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बजरंग सोनवणे हे विजयी झाले. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता पसरली. त्यातच जरांगे पाटील यांनी काही दिवसापूर्वी मतदारसंघात येऊन भाजप व त्यांच्या महायुतीतील नेत्यांना खुले आवाहन दिल्याने कार्यकर्ते चांगलेच धास्तावलेले दिसत आहेत. लोकसभा निवडणुकीत जात व प्रवर्गावर मतदान झाले. त्यामुळे याही विधानसभेला अशाच प्रकारे मतदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. धारूर वडवणी तालुक्यात ओबीसी समाजाचे प्राबल्य दिसून येत आहे. तर माजलगाव तालुक्यात मराठा मुस्लिम व मागासवर्गीय यांचे मतदान जास्त आहे. माजलगाव तालुका हा धारूर व वडवणी तालुक्यापेक्षा मोठा असल्याने या तालुक्यात मतदारांची संख्या जास्त आहे. त्यामुळे याही तालुक्यातील मतदारांची भूमिका ही महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे उमेदवार कोणत्या जातीचा व कोणत्या समाजाचा द्यायचा, कोणता समाज आपल्या सोबत आहे, याची गोळा बेरीज सगळेच पक्ष करीत आहेत.

माजलगाव मतदार संघात निवडणूक लढवण्यासाठी अनेकजण इच्छुक आहेत, जो तो सामाजिक समीकरणे जुळवीत आहे, अनेक सामाजिक व धार्मिक कार्यक्रमाला हजेरी लावून सहानुभूती दाखविण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र कार्यकर्त्यांना अजूनही कोणताच मेळ लागत नाही. माझा नेता होईल का तुझा नेता होईल अशी चर्चा सुरू आहे. हॉटेल, पान टपरी व सार्वजनिक ठिकाणी कार्यकर्ते मतदानाची चर्चा करीत आहेत. त्यामुळे या मतदारसंघाचे चित्र अजूनही स्पष्ट दिसत नाही. महायुती व महाविकास आघाडी एकसंघ आहे अशा वलग्ना होत असल्या तरी ही कार्यकर्त्यांची मने अजूनही एकमेकांना मिळालेले नाहीत त्यामुळे येणाऱ्या काळात माजलगाव मतदार संघा मध्ये अनेक घडामोडी घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.



**चौसाळा येथिल महाकाल गणेश ग्रुप मंडळाची आरती भाजपा अनुसुचित जाती मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर व त्यांची धर्मपत्नी अंकिता कुचेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आली यावेळी महाकाल गणेश मंडळाचे अध्यक्ष धीरज थोरात उपाध्यक्ष तुषार ढवारे सचिव वैभव काळे, लखन सोनवणे,अजय इंगोले, रोहन ढोकणे,भैय्या शिंदे,कपिल मस्के यांच्यासह महाकाल गणेश ग्रुप मंडळाचे पदाधिकारी व भावीक भक्त मोठया संख्येने उपस्थीत होते.**

# ऑल इंडिया पँथर सेनेच्या जिल्हा संपर्क कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी उपस्थित रहा - पँथर नितीन सोनवणे

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार मराठा आरक्षणाचे योद्धा मनोज जरांगे व ऍड.अविनाश गंडले यांच्या हस्ते ऑल इंडिया पँथर सेनेच्या बीड जिल्हा संपर्क कार्यालयाचे उद्घाटन सोमवार दिनांक ०९/०९/२०२४ ठिक २ वाजता शिवराज पान सेंटर समोर बडगे बापू बिल्डिंगच्या खाली जगताप कॉम्प्लेक्स येथे संपन्न होणार आहे.

ऑल इंडिया पँथर सेनेच्या माध्यमातून दलित शोषित पीडित आदिवासी मुस्लिम बहुजन वर्गाच्या न्याय हक्कासाठी लढण्यासाठी देशात अस्तित्वात असलेल्या मनुवादी व्यवस्थेविरोधात संविधान वाचवण्याचा लढा तीव्र करण्यासाठी जनसामान्यांच्या मूलभूत प्रश्नासाठी आंदोलनात्मक पवित्र घेऊन जनसामान्यांचे जन आंदोलन उभा करण्यासाठी दलित अत्याचार ही राष्ट्रीय आपत्ती सारखी परिस्थिती असून दलित



अत्याचार विरोधात आवाज उठवण्याचे काम या संघटनेच्या माध्यमातून होत आहे. जातीयता ही कोरोनापेक्षा भयानक व्हायरस आहे हा व्हायरस नष्ट करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.तरी बीड जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराज, फुले,शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, टिपू सुलतान यांच्या विचारावर चालणाऱ्या सर्व कार्यकर्ते पदाधिकारी समाज बांधव यांनी उपस्थित राहावे.असे आव्हान ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी केले आहे.



**सायं दैनिक महाराष्ट्र. आरंभ चे पत्रकार. सुनिल थोरात यांचा वाढदिवस हॉटेल सुखसागर येथे मानवी हक्क अभियान टीमच्या वतीने साजरा करण्यात आला. यावेळी शहराध्यक्ष संदीप भैया वाघमारे, तालुका सचिव रमेश जाधव, संजय वाघमारे सर, वचिष्ठ रकताटे , गोपाल वाघमारे, अनिकेत वाघमारे, प्रकाश थोरात, पत्रकार आकाश लोखंडे, सचिन भैया लोखंडे, अनिल खंडागळे सर यांची उपस्थिती होती.**

# जयभीम राऊतचे डॉक्टर होण्याचे स्वप्न होणार साकार...!

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील पंचशील नगर भागातील रहिवासी तथा बीड जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त लेखापाल (डेप्युटी अकौटंट) डी. एम. राऊत यांचा मुलगा जयभीम देविदास राऊत याने वैद्यकीय व्यवसाय अभ्यासक्रमासाठी लागू असलेल्या नीट परीक्षा विशेष प्रावीण्यसह उतीर्ण होऊन एमबीबीएस या वैद्यकीय व्यवसाय अभ्यासक्रमासाठी साठी पात्र झाला. एमबीबीएस या वैद्यकीय व्यवसाय अभ्यासक्रमासाठी त्याचा धुळे येथील शासकीय मेडिकल कॉलेजला प्रवेश झाल्यामुळे त्याचे डॉक्टर होण्याचे स्वप्न लवकरच पूर्ण होणार आहे. बीड शहरातील पंचशील नगर भागातील रहिवासी तथा बीड जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त लेखापाल (डेप्युटी अकौटंट) डी. एम. राऊत यांचा मुलगा जयभीम देविदास राऊत याची**

लहानपणापासून डॉक्टर होण्याची तीव्र



इच्छा होती. डॉक्टर होण्याची त्याची महत्वकांक्षा आणि मोठी जिद्द त्याने लहानपणापासून जोपासली. डॉक्टर होण्याच्या जिद्दीने तो लहानपणापासून सातत्याने अभ्यास करत होता. आई-वडिलांचे, गुरूंचे आणि वडीलधा-या माणसांचे वेळोवेळी मार्गदर्शन घेत जयभीम आपली वाटचाल आपल्या ध्येयाच्या दिशेने करत होता. अखेर त्याचे स्वप्न आज सत्यात येण्याच्या मार्गावर आहे. या यशाचे सर्व श्रेय त्यांने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना व संविधानास दिले आहे. तसेच आई वडिलांना दिले. मित्रपरिवार हितचिंतक यांच्या सततच्या प्रोत्साहनामुळे मी वैद्यकीय प्रवेश परीक्षेत यश मिळविले असल्याचे त्याने या वेळी आवर्जून सांगितले. वैद्यकीय व्यवसायाच्या माध्यमातून भविष्यात जास्तीजास्त गरजू लोकांना मदत करणार असल्याचे या वेळी जयभीम राऊत याने बोलताना सांगितले.

एमबीबीएस या वैद्यकीय व्यवसाय अभ्यासक्रमाला प्रवेश मिळाल्याबद्दल त्याचे महामानव अभिवादन ग्रुपच्या सर्व सदस्यांनी तसेच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, पत्रकारिता आणि विविध व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांसह पदाधिकारी कार्यकर्त्यांनी अभिनंदन करून त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# गेवराई तहसील कार्यालयावर उद्या रिपाईचा एल्गार मोर्चा

## गायरान धारकांनी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे - दत्ता बनसोडे

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील आणि मुळूकवाडी येथील गट नंबर ९९ ११७ व १३६ मधील वहिती असलेल्या गायरान जमिनीचा सातबारा पोट खराब वर्ग व मध्ये नोंद घेण्यात आल्यामुळे १९६४ पासून गायरान जमिनी कसून आपली उपजीविका भागविणाऱ्या गायरानधारकांना शासनाच्या विविध योजना व पीक कर्जाच्या लाभापासून वंचित ठेवण्याचे काम महसूल प्रशासनाकडून करण्यात येत आहे. ही बाब गायरानधारकांवर अन्याय करणारे आहे. मौजे मुळूकवाडी सह गेवराई तालुक्यातील गायरान जमिनीचा सातबारा वर्ग अ मध्येच कायम ठेवण्यात यावा या मागणी करिता रिपाईच्या वतीने सोमवार दिनांक ९ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता गेवराई तहसील कार्यालयावर एल्गार मोर्चाचे




आयोजन करण्यात आले आहे.१९६४ पासून गेवराई तालुक्यातील गायरानधारक जमिनी कसून आपल्या कुटुंबाची उपजीविका भागवत आहेत. व हिती करीत असलेल्या जमिनीचा २०१५ व २०१६ पर्यंत शासनाच्या विविध योजनांचा व पीक कर्जाचा लाभ मिळत होता. परंतु गेवराई तालुक्यातील वहिती जमिनीचा सातबारा पोट खराब अ मधून पोट खराब ब मध्ये घेण्यात आल्यामुळे गेवराई

तालुक्यातील गायरानधारक शासनाच्या विविध योजना पीक कर्जापासून वंचित आहे या मागणी करिता ९ सप्टेंबर २०२४ रोजी रिपाईच्या वतीने गेवराई येथील तहसील कार्यालयावर एल्गार मोर्चा करण्यात येणार आहे. एल्गार मोर्चामध्ये गेवराई तालुक्यातील गायरानधारकांनी व कार्यकत्यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रिपाईचे युवा जिल्हा उपाध्यक्ष दत्ता बनसोडे यांनी केले आहे.

# दिव्यांगांना बसमध्ये सुखकर व आरामदायी होणार प्रवास!

## सर्वच एसटी बसमध्ये दिव्यांगांना कायमस्वरूपी आरक्षण
## दिव्यांग कल्याण मंत्रालय अध्यक्ष आ. बच्चू कडू यांच्या पाठपुराव्याला यश

**नवनाथ आडे । गेवराई**

**गेवराई : राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या एसटी बसमध्ये दिव्यांग प्रवाशांना कायमस्वरूपी आरक्षित आसन देण्यात आले आहे. ते कोणत्याही थांब्यावर चढल्यास त्यांना त्यांचे आरक्षित आसन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित वाहकाची असणार आहे. असा निर्णय नुकताच एसटी महामंडळाने घेतला आहे.**

दि.०२ सप्टेंबर रोजी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने एक परिपत्रक जारी केले असून, साधी, शिवशाही, शिवसेरी, निमआराम, शिवाई, विना वातानुकूलित, ईव्ही ९, मिडी, शयन आसनी, जन शिवनेरी आशा सर्वच बसेस मध्ये यापुढे दिव्यांगांसाठी सीट आरक्षित राहणार आहे. याबाबत दिव्यांग कल्याण मंत्रालय अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांनी पाठपुरावा केला होता. आणि अखेर त्यांच्या पाठपुराव्यानंतर महाराष्ट्र शासनाने व राज्य परिवहन मंडळाने हे परिपत्रक जारी केले असून, त्याची तातडीने अंमलबजावणी करावी असे आदेश देण्यात आले आहेत.

राज्यात २३ लाखांपेक्षा जास्त विविध प्रकारच्या दिव्यांगांची संख्या असून, यापूर्वी दिव्यांगांना एसटी बसेस मध्ये आरक्षण दिले जात नव्हते. त्यासोबतच नवीन परिपत्रकानुसार आरक्षित केलेली सर्व आसने दिव्यांगांसाठी कोणत्याही थांब्यावरून उपलब्ध केली जाणार आहेत. ही सर्व आरक्षित आसने बसमधील वाहक आणि चालक दिव्यांगांना मदत करणार आहेत.

याचबरोबर दिव्यांगांना प्रवास करताना कोणती अडचण येऊ नये म्हणून त्यांना बसमध्ये चढ-उतार करताना प्राधान्य द्यावे, तसेच त्यांचा थांबा आल्यानंतर त्यांना अवगत करून बसमधून उतरण्यासाठी चालक, वाहकांनी सर्वतोपरी मदत करावी, असे निर्देशही देण्यात आले आहेत. यामुळे दिव्यांगाचा प्रवास यापुढे अधिक सुखकर व आरामदायी होईल, असा विश्वास एसटी महामंडळाकडून व्यक्त केला आहे.

शासनाच्या या निर्णयामुळे राज्यातील लाखो दिव्यांगांचा प्रवास सुखकर होणार असून, दिव्यांग कल्याण मंत्रालय प्रमुख आमदार बच्चू कडू यांच्या पाठपुराव्यामुळे हे शक्य झाले आहे.

-रामदास खोत, राज्य संपर्कप्रमुख प्रहार

सन १९९५ पासून राज्यातील दिव्यांग सर्व प्रकारच्या बसेस मध्ये आरक्षण मागत होते. तब्बल तीस वर्षांनंतर दिव्यांग प्रवाशांना आरक्षण



मिळाले आहे. आता अंमलबजावणी झाली पाहिजे.

-धर्मेंद्र सातव, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष



# ११ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या त्या नराधमाला फाशीची शिक्षा द्या

बीड । प्रतिनिधी

पेठ बीड भागातील आरेफ आली नगर,मोहम्मद कॉलोनीतील एका मक्तब मध्ये अरबी शिक्षण देणाऱ्या धर्मगुरू कडून ११ वर्षीय अल्पवयी मुलीवर लैंगिक अत्याचार करण्याचे प्रकार ५ सप्टेंबर रोजी उशिरा रात्री समोर आले.याप्रकरणी नराधमाला फाशीचे शिक्षा देण्यात यावी या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाधिकारी कार्यालय समोर आंदोलन करण्यात आले.

### मनसेचे जिल्हाधिकारी कार्यालय समोर आंदोलन

सविस्तर वृत्त असे की, बीड जिल्ह्यासह राज्यभरात महिला सुरक्षितेचा विषय गंभीर होत चालला असून मागील काही महिन्यापासून महिला अत्याचाराच्या घटना समोर येत आहे.काल परवा पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आरेफ आली नगर,मोहम्मद कॉलोनीतील एका मक्तब मध्ये अरबी शिक्षण देणाऱ्या धर्मगुरू कडून ११ वर्षीय अल्पवयी मुलीवर लैंगिक अत्याचार करण्याची घटना समोर आली. याप्रकरणी ५ सप्टेंबर रोजी उशिरा रात्री गुन्हा दाखल झाला असून आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शनिवारी सकाळी ११:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. यावेळी मनसेचे सुमंत धस (जिल्हा अध्यक्ष),श्रीराम बादाडे (जिल्हा अध्यक्ष),राजेंद्र मोटे (जिल्हा अध्यक्ष),वर्षा ताई जगदाळे (महिला राज्य उपाध्यक्षा),सोमेश कदम (जिल्हा सचिव),ऋषीकेश गिराम (विद्यार्थी सेना जिल्हा अध्यक्ष),अशोक सुरवसे (शेतकरी सेना जिल्हा अध्यक्ष),सदाशिव बिडवे (उपजिल्हा अध्यक्ष),करण लोंढे (शहर अध्यक्ष),आदर्श तरकसे (शहर उपाध्यक्ष),पठाण अमर जान (शहर संघटक),प्रतिक लोळगे,मुस्तफा पठाण सह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठवाडा साहित्य परिषद कार्यकारी मंडळ निवडणूक कार्यक्रम जाहीर

शिरूर कासार (वार्ताहर)

मराठवाडा साहित्य परिषद कार्यकारी मंडळाचा निवडणूक २०२४ कार्यक्रम नुकताच जाहीर झाला असून मंडळाच्या निवडणूकीसाठी मतदारांची प्राथमिक यादी २१ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिद्ध झाली होती. त्यावरील आक्षेप वा दुरूस्तीसाठीची मुदत संपल्याने दि.६ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ७ वाजता ती प्रकाशित करण्यात आली आहे.

या निवडणूकीसाठी नामनिर्देशनपत्रे भरण्याची मुदत दि.१४ सप्टेंबर २०२४ ते २० सप्टेंबर २०२४ अशी असून दि.२१ सप्टेंबर रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी होऊन वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध होणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत २३ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२४ अशी आहे. उमेदवारांची अंतिम यादी दि.२५/०९/२०२४ ला प्रसिद्ध होईल. तद्नंतर दि.१०/१०/२४ ते दि.८/११/२४ या कालावधीमध्ये निर्वाचन अधिकाऱ्यांनी मतदारांना मतपत्रिका पाठवणे आणि मतदारांनी त्या मतपत्रिका निर्वाचन अधिकाऱ्यांकडे परत पाठवणे असा कार्यक्रम आहे. दि.९/११/२४ रोजी सकाळी १० वाजेपासून मतमोजणीस सुरवात होऊन निकालीची घोषणाही त्याच दिवशी करण्यात येईल असे मराठवाडा साहित्य परिषद निर्वाचन अधिकारी डॉ.राम चव्हाण यांनी कळविल्याची माहिती मराठवाडा साहित्य परिषद शिरूर कासार चे उपाध्यक्ष तथा एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य चे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड यांनी प्रसिद्धीमाध्यमांशी बोलतांना दिली.

माझी मराठी मराठाच मोहि
मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद

# राजरत्न वंजारे याचा वाढदिवस भंते आनंद यांच्या सुश्राव्य प्रवचनाणे संपन्न



बीड । प्रतिनिधी

दर वर्षी प्रमाणे या वर्षी पण सम्राटपुत्र राजरत्न डॉ. जितीन वंजारे याचा वाढदिवस सामाजिक उपक्रम राबवून जोरदार अभिष्टचिंतन सोहळा पार पाडला.ह्या सोहळ्याच मुख्य आकर्षण जेतवन बुद्ध संस्कार केंद्र पैठण चे व्यवस्थापक भंते आनंदजी हे होते. त्यांनी बुद्धाच्या मार्गाने गेल्यास जीवनात होणारे अमुलाग्र बदल, साधू संतांची वारकरी परंपरा आणी भारतीय प्राचीन बुद्ध भिक्खू संघाची कार्य प्रणाली सांगितली, भगवान गौतम बुद्धाच सम्यक ज्ञान सांगून संत तुकोबानी पण बुद्धाच्या विचाराचा अवलंब कसा केला तेही सांगितले त्याच बरोबर आज यद्धाची नाही तर जगाला बुध्दाची गरज आहे. मानवता प्रज्ञा शील करुणा यावर ज्ञान दिल.भगवान बुद्धाची त्रिसरण पंचशील आणी अष्टांग मार्ग सांगितले, महामानावंचे विचार सांगितले डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज यांच्या मानवतेच्या गोष्टी सांगितल्या. एकंदरीत सर्व विधिवत पूजा करून नंतर केक कापला. यावेळी कार्यक्रमाला पाथर्डी प. स.माजी सभापती तथा जिल्हा परिषद सदस्य पैलवान गहीनाथ दादा सिरसाठ, त्यांच्या पत्नी माजी सरपंच सिरसाठ ताई,टाकळी गावच्या सरपंच किसवे ताई, गाडे ताई, चव्हान ताई, मच्छिन्द्र मानकर मामा,शेषेराव आप्पा गाडे,आप्पा शिरसाठ,आरोग्य कर्मचारी गाडे साहेब,उद्योजक वस्ताद भरत जाधव,भगवानभाऊ गर्जे,शुभम गांधी,श्रीमंत शिरसाठ,गोटूकाका गांधी,इसाक भाई, मुख्तर भाई, गोविंद चव्हाण,बाबासाहेब ढाकणेभाऊ, विशाल काळे,संदीप बारगजे,उगले फिटर,स्नेहा वंजारे, सीमा वंजारे, संजीवनी वंजारे आदींसह समस्त ग्रामस्थ टाकळी मानूर उपस्थित होते.

यावेळी जी प सदस्य गहीनाथदादा सिरसाठ यांनी राजरत्न ला भावी आयुष्याच्या वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.गावात चांगल्या आरोग्य सेवेबद्दल डॉ जितीन वंजारे यांचं कौतुक केल. शिंदे मामा, शुभम गांधी, सिरसाठ ताई यांनी शुभेच्छा दिल्या आणी कार्यक्रमाचे आभार डॉ जितीन वंजारे यांनी मानले.

## पप्पुजी कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या रिपाई च्या महत्वपूर्ण बैठकीला हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा – अक्षय वडमारे

नाळवंडी । प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हा पदाधिकारी सर्व तालुका अध्यक्ष,महिला आघाडी पदाधिकारी,शहर प्रमुख,युवा रिपाइ पदाधिकारी, तसेच सर्कल प्रमुख व क्रियाशील पदाधिकारी तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे सर्व कार्यकर्ते,यांना जाहीर आव्हान करण्यात येत आहे की,आगामी विधानसभेच्या निवडणुका संदर्भात तसेच काही विविध विषयावर चर्चा



करण्यासाठी व महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यासाठी महाराष्ट्राचे नेते,तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे युवक प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पूजी कागदे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली सोमवार दिनांक ९ सप्टेंबर रोजी सकाळी ११:३० वाजता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,नगर रोड,बीड येथे होत असलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीला शिव फुले शाहू आंबेडकरी पदाधिकाऱ्यांनी तसेच कार्यकर्त्यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे जाहीर आव्हान अक्षय वडमारे यांनी या वेळी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# लोकशाही पत्रकार संघाच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी दत्तात्रय नरनाळे यांची निवडी जाहीर

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्याचा बुलंद आवाज म्हणून ओळख असणाऱ्या दैनिक मराठवाडा पत्र चे मुख्य संपादक दत्तात्रय नरनाळे यांची निवड लोकशाही पत्रकार संघाच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी निवड केली आहे. लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत (बीबी ) वैद्य यांच्या हस्ते त्यांना निवडीचे नियुक्तीपत्र देण्यात आले. राज्यभरात लोकशाही पत्रकार संघामुळे पत्रकारांचे मजबूत संघटन उभारले जात आहे. पत्रकारांना विमा कवच, त्यांच्या पाल्यांचे शिक्षण, घर, नवे तंत्रज्ञान कौशल्य, सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्याचे नियोजन या प्रश्नांकडे लोकशाही पत्रकार संघाने लक्ष केंद्रित केले असल्याने राज्यभरातील पत्रकारांचा देखील मोठा प्रतिसाद लोकशाही पत्रकार संघाला मिळत आहे.



पत्रकार हा लोकशाहीचा महत्वाचा स्तंभ असूनही तो अनेक मुलभूत सुविधांपासून वंचित आहे, त्याच्या संरक्षणाचा प्रश्न मागे पडला आहे, तो लोकशाहीचा महत्वाचा घटक असूनही निराधार असल्याचे दिसते आहे. लोकशाही चे जतन करणे आता लोकशाही पत्रकार संघाचे काम आहे. असे मत व्यक्त केले. यासोबतच डिजिटल मीडिया'ला पत्रकारितेच्या मुख्य प्रवाहात घेतले जात नाही. 'डिजिटल मीडिया'चे काम करणाऱ्या पत्रकारांन त्यांचे अधिकार मिळत नाहीत.

ऑनलाईन क्षेत्रात काम करत असलेल्या पत्रकारांच्या पाठीशी ठाम पणे उभे राहून त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी भविष्यात काम करणार असल्याचं सांगत या जिल्हा पातळीवरील महत्त्वाच्या पदावर निवड करत काम करण्याची संधी दिली म्हणून अध्यक्ष भागवत वैद्य व लोकशाही पत्रकार संघाच्या सर्व टीमचेही आभार मानले. एकंदरीत या निवडीनंतर पत्रकार दत्तात्रय नरनाळे यांच्यावर विविध माध्यमातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.पुढील कार्यास लोकशाही पत्रकार संघाच्या सर पदाधिकारी यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# किल्ले धारुरमध्ये आदर्श शिक्षक पुरस्कार वितरणाचा भव्य कार्यक्रम संपन्न

## स्व.संभाजीराव जगताप गुरुजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त जिल्हा परिषदेच्या आठ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

किल्ले धारुर/ रोहित फावडे

पाच सप्टेंबर रोजी शिक्षक दिन आणि सुस्मृत संभाजीराव जगताप गुरुजी यांच्या चतुर्थ स्मृतिदिनानिमित्त युवा कृषि विज्ञान मंडळ सामाजिक संस्था किल्ले धारूर यांच्या वतीने किल्ले धारुर तालुक्यातील जि.प. शाळांतील शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम आयोजित केला. कार्यक्रमाचे अध्यक्षपदी गट विकास अधिकारी श्री. संतोष बंगवाडे यांनी भूषवले. प्रमुख वक्ते म्हणून दत्ता भाऊ बारगजे, आणि श्रीमती मंदाताई बारगजे आनंदग्राम, बीड उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात संभाजीराव जगताप गुरुजी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

प्रमुख अतिथींचे स्वागत गीत गाऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचा कृषी विज्ञान मंडळ सामाजिक संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी धारूर तालुक्यातील आदर्श पुरस्कारासाठी निवड झालेल्या शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते फेटा बांधून, शाल, पुष्पगुच्छ आणि स्मृतीचिन्हासमवेत प्रशस्तीपत्र देऊन सत्कार



करण्यात आला. पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांमध्ये श्री. विसे दीपक रमेशराव, श्री. कुलकर्णी शरद दिगांबर, श्री. चव्हाण सर्जेराव बन्सी, श्री. लोंढे सुधाकर कोंडीबा, श्री. गोरे सटवा लिंबाजी, श्रीमती वराट उज्वाला भगवानराव, श्री. सलगर सुरेश राजाराम, आणि श्रीमती तारसे सारिका गोपाळराव यांचा समावेश होता.

प्रमुखवक्ते दत्ता भाऊ बारगजे यांनी शिक्षण आणि शिक्षिका संबंधित अनुभव कथन केले आणि त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे समारोप गट विकास अधिकारी संतोष बंगवाडे यांनी केला. त्यांनी शिक्षक दिन आणि संभाजीराव जगताप गुरुजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त पुरस्कार वितरणाची योजना औचित्यपूर्ण असल्याचे सांगितले. ते म्हणाले, आदर्श शिक्षक पुरस्कार आयोजन हे शिक्षण क्षेत्रातील कर्तुत्वाची शाब्दिक प्रशंसा करण्याचे एक उत्कृष्ट प्रतिकात्मक कार्य आहे. यावेळी श्रीमती मंदाताई बारगजे आनंदग्राम, बीड आपले अनुभव व्यक्त केले यावेळी पुरस्कार मिळालेल्या श्री. लोंढे सुधाकर कोंडीबा आणि श्रीमती वराट उज्वाला भगवानराव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाची प्रस्तावना कृषी विज्ञान मंडळाचे सचिव सूर्यकांत जगताप यांनी मांडली, तर सूत्रसंचालन आदर्श शिक्षक श्री. विलास काळे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आदर्श शिक्षक श्री. श्रीराम सिकची यांनी केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने शिक्षक, नागरिक, महिला, पत्रकार बंधू, समाजिक संस्थेचे अध्यक्ष आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## जय किसान गणेश मंडळाच्या वतीने वाजतगाजत मोठ्या उत्साहात पर्यावरण पूरक गणेशाच्या मूर्ती ची स्थापना

किल्लेधारूर/ रोहित फावडे

धूमधडाक्यात गणेश उत्सव साजरा करताना पर्यावरण राखणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. प्लॅस्टर ऑफ पॅरिसची मूर्ती वापरू नये, ती विरघळण्यास वेळ लागतो. त्यामुळे पर्यावरणाची हानी होत असून ते पर्यावरणाला घातक आहे त्यासाठी जनजागृती व्हावी म्हणून धारूर येथील नावलौकिक जय किसान गणेश मंडळाने पर्यावरण पूरक गणेश मूर्ती करून एक पर्यावरणाचा संदेश दिला आहे

धारूर तालुक्यात ६५ गणेश मंडळाने यावर्षी पोलीस प्रशासनाकडून परवाने घेऊन गणेशाची स्थापना केली आहे तालुक्यात मोठ्या उत्साहात दरवर्षी गणेशोत्सव साजरा केला जातो.सकाळ पासूनच लहान बालके जेष्ठांनी गणेशाची मूर्ती घेण्यास गर्दी केली होती यामुळे बाजार परिसर गजबजला होता.शहरात विविध सामाजिक कार्यक्रम राबिविणारे मोठे गणेश मंडळ आहेत सलग दहा दिवस सामाजिक कार्यक्रम आयोजित करून गणेशोत्सव साजरा केला जातो येथील जय किसान गणेश मंडळाच्या वतीने माघील तीन वर्षांपासून पर्यावरण पूरक गणेशाची मूर्ती बसविले जाते.तसेच शहरात जय हनुमान गणेश



मंडळ,शिवगर्जना गणेश मंडळ,शिवशंकर गणेश मंडळ,नाथ नगरचा राज गणेश मंडळ आशा अनेक नावाजलेल्या गणेश मंडळाने मोठ्या उत्साहात ढोल पथक लेहजीम खेळत आनंदाने गणपती आणत गणेशाची स्थापना केली.



## गणेश उत्सवातून सांस्कृतिक व एकतेची ऊर्जा मिळते – राजेंद्र मस्के

### राशी निवास्थानी श्री गणेशची स्थापना ..!

बीड । प्रतिनिधी

बुद्धीदाता व कलेचा अधिपती श्री गणेशाचा पारंपारिक गणेश उत्सव देशभरात उत्साहात साजरा केला जातो. महाराष्ट्रात श्री. गणेश उत्सवाच्या माध्यमातून परंपरा व संस्कृतीचे मुळे खोलवर रुजली आहेत. अबाल वृद्ध व अठरा पगड जातीतील माणूस या उत्साहात आदराने व जोमाने सामील होतो. पारंपारिक गणेश उत्सवातून तरुणांच्या बुद्धीला विस्तार व कल्पकतेला वाव मिळतो. नवीन ऊर्जा प्राप्त होते. अशा आनंददायी गणेश उत्सवाच्या निमित्ताने सर्व गणेश भक्तांना मनपूर्वक शुभेच्छा देऊन, भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी सहकुटुंब विधिवत पूजन करून, श्री गणरायाची राशी निवास्थानी आपल्या सवंगड्यांच्या साक्षीने स्थापना केली.

यावेळी कामगार मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश गिरी, संस्कृत्तिक प्रकोष्टचे प्रमोद रामदासी, बालाजी जाधव, लालासाहेब पन्हाळे, मारुतीराव तिपाले, बद्रीनाथ जटाळ, वैजिनाथ नेवाळे, हनुमान मस्के, अण्णासाहेब मस्के, देवदत्त चौरे, राहुल रसाळ सर, विकास वाघ सर, शरद बडगे, अनिल शेळके, सचिन मस्के, महेश सावंत, बाबू बडगे, शंकर तुपे, लक्ष्मण काटे, विकास गव्हाणे, रवींद्र कळसाने, कल्याण पवार, बाळू गात,अजय ढाकणे, राकेश बिराजदार, शरद घोलप, अरुण गवळी यांच्यासह कार्यकर्ते, गणेश भक्त उपस्थित होते.

# राष्ट्रवादी व भाजपच्या असंख्य कार्यकर्त्यांचा बदामराव पंडितांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश

## म्हसोबा तांडा झाला भगवामय

**गेवराई । प्रतिनिधी**

**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली गेवराई तालुक्यातील धोंडराई सर्कल मधील राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपच्या असंख्य कार्यकर्त्यांची शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. या प्रवेशामुळे म्हसोबा तांडा भगवामय झाला असून, बदामराव पंडित यांना आमदार केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही अशी प्रतिज्ञा प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनी केली आहे.**



माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली गेवराई विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि भारतीय जनता पार्टीच्या असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेमध्ये प्रवेश करण्याचा सपाटा लावला आहे. दररोज शिवसेनेमध्ये इनकमिंग होत असल्याने, बदामराव पंडित यांचे पारडे जड होताना दिसत आहे. दिनांक ६ सप्टेंबर २०२४ रोजी धोंडराई सर्कल मधील म्हसोबा तांडा येथील असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश करून शिवसेनेची शाखाही स्थापन केली आहे. यावेळी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, माजी सरपंच संतराम काळे, पिनू हंडाळ, हरिदास कुटे, तांगडे आण्णा, फैसल चाऊस, भागवतराव ढेंबरे, इकबाल शेठ, शिवाजीराव मेघारे, रामदास कोकाटे, सिद्धेश्वरी कोकाटे, डॉ हबीब का, गुलाबराव गायकवाड, अमोल सुतार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी राष्ट्रवादी व भाजपला सोडचिठ्ठी देऊन मधुकर शिंदे, ग्रामपंचायत सदस्य सुरेश हागर, पपेश माळी यांच्या नेतृत्वाखाली मनोहर शिंदे, गोरख शिंदे, सोपान धनगर, परसराम धनगर, अजय शिंदे, प्रदीप माळी, कुलदीप माळी, परमेश्वर माळी, कैलास माळी, दिलीप जाधव, अनिल राठोड, संजू कोळेकर, राजू माळी, अशोक कोळेकर, कैलास आडे, राजू जाधव, सचिन जाधव, सचिन सावंत, सुनील सावंत, पवन माळी, बप्पा माळी, बाळू शिंदे, काळु जाधव, सुरज माळी, रोशन जाधव, सतीश जाधव, रोहित जाधव, सुंदर जाधव, सुनील जाधव, योगेश गव्हाणे, अनिल माळी, साई हागर, पिनू नरोटे, पंडित कोळेकर आदींसह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला. बदामराव पंडित यांनी सर्वांच्या गळ्यात भगवे रुमाल घालून त्यांचे स्वागत केल्यानंतर बोलताना म्हटले की, दहा वर्ष मी आमदार नाही. परंतु जनतेशी कधी नाळ तुटू दिली नाही. आजही कोणाचेही काम आले तर गट-तट, पक्ष आणि राजकारण न पाहता मी त्याचे प्रामाणिकपणे काम करतो. त्याचाच परिणाम आज तालुक्यातली माणसं कोणत्याही पक्षात आणि कोणत्याही नेत्यासोबत असली तरी त्यांची मने माझ्यासोबत जोडलेली आहेत. त्यांचे नेहमी मला आशीर्वाद मिळत आलेले आहेत. निवडणुका आल्या की, गोरगरिबांना पैशाचे आमिष दाखवायचे, काहींना पदे द्यायची आणि त्यांची मतं घेऊन सत्तेत यायचं हे स्वप्न गेल्या अनेक वर्षापासून राष्ट्रवादी काँग्रेसचे अमरसिंह पंडित, विजयसिंह पंडित पहात आहेत. परंतु गोरगरीब जनतेने त्यांना चांगलेच ओळखले आहे. ऊस उत्पादक शेतकरी, मुकादम आणि ऊसतोड मजूर यांना त्यांचा चांगलाच अनुभव आला आहे. त्यामुळे त्यांना गेवराईकर स्वीकारत नाहीत. कोणतेही काम असेल तर माझ्याकडे बेधडकपणे या कोणाला घाबरण्याची गरज नाही मी तुमच्या सोबत खांद्याला खांदा लावून उभा आहे असेही बदामराव पंडित म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रस्तावित महेंद्र खरात यांनी केले तर हरिदास कुटे, सिद्धेश्वरी कोकाटे यांची समायोजित भाषणे झाली. कार्यक्रमास पंडित कोळेकर, भागवत हागर, मिलिंद वाघमारे, राजाभाऊ जावळे, इरफान पठाण आदींसह ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

# माजी राज्यमंत्री सुरेश धस यांच्या प्रयत्नाने

# आष्टी मतदारसंघातील ४ देवस्थानांच्या विकास कामासाठी १६ कोटी रु.मंजूर

## भाविक भक्तांना मिळणार मोठ्या सुविधा

आष्टी (सुरेश कांबळे)

माजी राज्यमंत्री सुरेश धस यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे आष्टी विधानसभा मतदारसंघातील..आष्टी तालुक्यातील श्रीक्षेत्र रेणुकामाता देवस्थान बेलगाव,श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव आणि पाटोदा तालुक्यातील श्री क्षेत्र संत मीराबाई गुरु भगवान संस्थान महासांगवी आणि श्रीक्षेत्र आ अश्वलिंग महादेव मंदिर पिंपळवंडी या देवस्थानांच्या विकासासाठी ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास विभागाच्या वतीने १६ कोटी रुपयांचा भरघोस निधी मंजूर करण्यात आला आहे.. याविषयीची अधिक माहिती अशी की,

महाराष्ट्र राज्यातील.. ब वर्ग दर्जा असलेल्या देवस्थानाच्या ठिकाणी दरवर्षी भाविक भक्त दर्शनासाठी मोठ्या संख्येने हजेरी लावत असतात.. अशा देवस्थानांचा विकास करणे बाबत.. ग्रामीण विकास विभाग शासन निर्णय दि.६ सप्टेंबर २० २४ नुसार ..आष्टी तालुक्यातील..श्री क्षेत्र रेणुका माता देवस्थान बेलगाव येथे वाहन तळ १०० लक्ष रु.,मंदिर परिसर सुशोभीकरण १० लक्ष रु.भक्तनिवास १० लक्ष रु.,संरक्षण भिंत १५४ लक्ष रु.,पुरुष भक्त निवास ८५ लक्ष रु.पोहोच रस्ता आणि सीडी वर्क १२० लक्ष रु. आणि पेव्हिंख ब्लॉक १० लक्ष रु.असे एकूण ४ कोटी ९० लक्ष रु.श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव या ठिकाणी प्रसादालय बांधकाम २०० लक्ष रु.वाहनतळ बांधकाम पेव्हर ब्लॉक व काँक्रिटीकरण करणे २०० लक्ष रु. असे एकूण ४.०० कोटी रु. पाटोदा तालुक्यातील.. श्री क्षेत्र संत मीराबाई गुरु भगवान संस्थान महासांगवी या ठिकाणी वाहन तळ बांधकाम ४२ लक्ष रु.पुरुष भक्त निवास बांधकाम १०० लक्ष रु. महिला भक्तनिवास बांधकाम ७७.२० लक्ष रु.पोहोच रस्ता २० लक्ष रु. पोलसह एलईडी लाईट १० लक्ष रु.स्ट्रीट लाईट १० लक्ष रु.,संरक्षण भिंत २० लक्ष रु.आणि सुशोभीकरण २० लक्ष रु.असे एकूण ३ कोटी रु. तसेच श्रीक्षेत्र अश्वलिंग महादेव मंदिर पिंपळवंडी या ठिकाणी प्रसादालय बांधकाम ८२ लक्ष रु.भक्तनिवास ५० लक्ष रु.

संरक्षण भिंत ४५ लक्ष रु.पेविंग ब्लॉक बसवणे ८० लक्ष रु.पोहोच रस्ता तयार करणे ९० लक्ष रु.आणि सुशोभीकरण करून लेव्हलिंग पथदिवे बसवणे ६३ लक्ष रु. असे एकूण ४ कोटी १० लक्ष रु. अशाप्रकारे या चार ब वर्ग दर्जातील मोठ्या देवस्थानाचा विकास करण्यासाठी एकूण १६ कोटी रु.अशी घसघशीत रक्कम मंजूर झाली असल्यामुळे.. या ठिकाणी येणार्या भाविक भक्तांना सुविधा मिळणार आहेत... त्यामुळे ..माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, आणि ग्रामीण विकास मंत्री गिरीश महाजन आमदार पंकजाताई मुंडे यांचे विशेष आभार व्यक्त केले आहेत..





चौसाळा:- येथिल भिमाशंकर शुगर मिल्स प्रा.लि येथील श्री गणेशाची आरती करताना जनरल मॅनेजर श्री डि.बी परदेशी साहेब , विधाते साहेब, आनंद शेटे, इलेक्ट्रीशियन मच्छिंद्र औताडे , तांदळे, कुलकर्णी, व सर्व कर्मचारी वर्ग



दोन वर्षापासून कडी नदी ला पाणीच नव्हते परंतु यावर्षी निसर्ग राजांनी चांगली साथ दिल्याने कडी नदीवरील दादेगाव तलाव ओव्हरफ्लो झाल्याने शेतकऱ्यात समाधान व्यक्त होत आहे ,,छायाचित्र सुरेश कांबळे



चौसाळा येथिल महाकाल गणेश मित्र मंडळाची आरती भाजपा अनुसुचित जाती मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर व त्यांची धर्मपत्नी अंकिता कुचेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आली यावेळी महाकाल गणेश मंडळाचे अध्यक्ष तुषार ढवारे,रोहन ढोकणे,लखन सोनवणे,अजय इंगोले,वैभव काळे,भैय्या शिंदे,कपिल मस्के यांच्यासह महाकाल गणेश मित्र मंडळाचे पदाधिकारी व भावीक भक्त मोठया संख्येने उपस्थीत होते.

## अखिल भारतीय पाचवी बौध्द धम्मपरीषदे निमित्त नियोजन बैठकीचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था, बीड व बीड येथील समस्त बौद्ध उपासक व उपासीका यांच्या संयुक्त विद्यमानाने बीड येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी ६९ व्या धम्म चक्र अनुप्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने पाचवी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात येत आहे.नियोजीत बौद्ध धम्म परिषदेच्या पुर्व तयारीसाठी व नियोजनाबाबत विचार विनिमय करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बीड येथे रविवार दि. ०८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४:०० वाजता पु. भिक्खु डॉ.उपगुप्त महाथेरो - पुर्णा यांच्या अध्यक्षतेखाली महत्वपुर्ण बैठक आयोजीत करण्यात आले आहे.

याबैठकीस प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था, बीड व सर्व शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनियर, वकील संघ, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी वर्ग आणि बीड येथील सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणारे समस्त बौद्ध उपासक उपासिका उपस्थित राहणार आहेत. तसेच सामाजिक व धार्मीक चळवळीत सक्रिय असणाऱ्या सर्वच मान्यवरांची



उपस्थिती यावेळी लाभणार आहे. तरी आपण या बैठकीत सहभागी होऊन धम्म चळवळीसाठी सर्वतोपरी सहकार्य करावे असे आवाहन प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था, बीड व बीड येथील समस्त बौद्ध उपासक व उपासीका यांनी केले आहे.



बीड : शहरातील पेठ बीड भागातील मानाचा गणपती असलेल्या आझाद हिंद गणेश मंडळाच्या श्री गणरायाच्या आगमनाप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी गणेश मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, शेकडो गणेशभक्त उपस्थित होते.



## राजमाता जिजाऊ महाविद्यालयात राजे उमाजी नाईक जयंती निमित्ताने अभिवादन

किल्ले धारूर /,प्रतिनिधी

७ सप्टेंबर रोजी धारूर येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये राजे उमाजी नाईक यांच्या जयंती निमित्ताने प्रतिमेस उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनायक कापावार, प्रा. सिद्धेश्वर काळे, श्री. सुरेश जगताप श्री. माणिकराव आडे यांचे उपस्थिती होती. यांबरोबरच प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.



नांदेड ।प्रतिनिधी

नांदेड:दि.७.जिल्यातील किनवट तालुक्या मधील छोट्याश्या मौजे सावरगांव येथील मूळच्या रहिवाशी असलेल्या कॉम्रेड उज्वला पडलवार यांची लोकमतने दखल घेतली होती. आणि देशाच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या राजभवनातील कार्यक्रमासाठी त्यांना निमंत्रण दिले होते.नांदेड येथील सेंटर ऑफ इंडियन ट्रेड यूनियन्स (सीटू) कामगार संघटनेच्या धडाडीच्या नेत्या,कार्यकर्त्या तथा जिल्हाध्यक्षा आणि राज्य सचिव म्हणून कॉ.उज्वला ह्या योग्य पद्धतीने काम पहात आहेत.त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात आणि राज्यात अनेक यशस्वी आंदोलने होऊन गोरगरीब पीडितांना न्याय मिळाला आहे.त्यांची आणि त्यांच्या संघटनेची दखल घेत लोकमत ने सखी मंचच्या रोप्य महोत्सवी कार्यक्रमात त्यांना निमंत्रित केले आहे होते.तसे पत्र लोकमत समूहाचे प्रमुख राजेंद्र दर्डा यांनी त्यांना २८ ऑगस्ट रोजी पाठविले होते.देशाच्या आदरणीय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूयांच्या सोबत संस्मरणीय भेट आणि सुसंवाद कार्यक्रमासाठी महाराष्ट्र आणि गोवा या राज्यातून २५ महिलांची निवड करण्यात आली होती.त्यात कॉ.उज्वला यांचा समावेश होता.दि.३ सप्टेंबर रोजी राजभवन मुंबई येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमात सीटू कामगार संघटनेच्या धडाडीच्या कार्यकर्त्या म्हणून त्यांना निमंत्रित केले होते.

## आष्टी तहसीलदारपदी वैशाली पाटील

आष्टी । प्रतिनिधी

येथील तहसीलदार प्रमोद गायकवाड यांची बदली झाल्याने त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर वैशाली पाटील यांनी शुक्रवार दि ६ सप्टेंबर रोजी ३ वाजता पदभार स्वीकारला आहे. तहसीलदार वैशाली पाटील यांनी या अगोदर नागपूर व बीड जिल्ह्यातील माजलगाव, धारूर येथे तहसीलदार म्हणून उत्कृष्ट काम पाहत होत्या. त्यांनी आजपर्यंत तहसीलदार म्हणून आपल्या कार्याची चुणूक दाखवून दिली. त्यांनी पदभार स्वीकारताच तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी व तलाठी, मंडळ अधिकारी यांची आढावा बैठक घेऊन कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.



परळी ।प्रतिनिधी

जगाचा अन्नदाता असलेला बळीराजा अतिवृष्टीच्या संकटात सापडलेला असून बळीराजावरील ओढवलेले हे नैसर्गिक संकट दूर करून बळीराजाला सुख-समृद्धी आणि भरभराटी दे अशी प्रार्थना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जेष्ठ नेते फुलचंद कराड यांनी केली.शहरातील नाथ नगर भागात असलेल्या गणेश मंडळाच्या गणेशाची प्राणप्रतिष्ठा फुलचंद कराड यांच्या शुभ हस्ते करण्यात आली.

मागील सात दिवसात मराठवाड्यात अतिवृष्टी झाली या अतिवृष्टी मध्ये शेतकऱ्यांचे पीक पूर्णतः उध्वस्त झाले असून सरकार कडून पंचनामे करण्याचे काम सुरू आहे.

# कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या पाठपुराव्याला यश; केंद्र सरकारकडून महाराष्ट्रात ९० दिवसांसाठी हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरु करण्यास मान्यता

## सोयाबीन निर्यातीवर अनुदान तसेच सोया मिल्क आयातीवर शुल्क लावल्याने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना होणार अधिकचा लाभ

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्र सरकारकडे मागील काही दिवसांपासून केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून केंद्र सरकारने महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यांमध्ये ९० दिवसांसाठी किमान हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली आहे. केंद्रीय कृषी मंत्रालयाने धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार समर्थन मूल्य योजनेच्या अंतर्गत सोयाबीन व उडीद ही दोन पिके ९० दिवसांसाठी हमीभावाने खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान हे राज्य कृषी महोत्सवाच्या निमित्ताने परळीत आले तेव्हा धनंजय मुंडे यांनी याबाबत मागणी केली होती, तसेच दिल्ली येथे भेटूनही याबाबत पाठपुरावा केला होता.

केंद्र सरकारने महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यांमध्ये सोयाबीनची किमान आधारभूत किंमत ही ४८९२ रुपये प्रति क्विंटल इतकी निश्चित केली असून, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांसह वेळोवेळी पाठपुरावा व समर्थन देणारे



राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार व्यक्त केले आहेत.

राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मदत व्हावी व त्यांचे बाजारभाव पडल्याने नुकसान होऊ नये या दृष्टीने हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यात यावी, त्याचबरोबर सोया मिल्क, खाद्यतेल, सोया केक इत्यादी उत्पादने आयात करण्यावर शुल्क लावावे तसेच सोयाबीन निर्यातीसाठी प्रतिक्विंटल किमान ५० डॉलर अनुदान द्यावे याबाबत मी केंद्र सरकारकडे सातत्याने पत्र व्यवहार व पाठपुरावा केला तसेच यासंदर्भात केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याशी देखील वारंवार संपर्कात होतो. केंद्र सरकारने ९० दिवसांकरिता हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिल्याने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अधिकचा आर्थिक लाभ मिळणार असल्याचा मला मनापासून आनंद होतो आहे, अशा भावना कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केल्या आहेत.

मागील वर्षी सोयाबीन चे भाव पडल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले होते. मात्र त्याही परिस्थितीत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी सातत्याने पाठपुरावा करून राज्य शासनाच्या वतीने सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी पाच हजार रुपये आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला. यासाठी राज्य सरकारने ४२०० कोटी रुपये अनुदान उपलब्ध करून दिले असून येत्या दोन-तीन दिवसात या अनुदानाचे थेट वितरण शेतकऱ्यांच्या खात्यावरती करण्यात येणार आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT